
Impact Factor-7.675 (SJIF)
[illegible]

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## November -2020



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage
Walgaon Dist. Amravati.

Executive Editor:
[illegible]

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308


# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## November-2020

**SPECIAL ISSUE-CCLIV (254)**








**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor :
Dr.Sanjay J. Kothari
Head,Deptt.of Economics,
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 254 | November,2020


| | | |
|---|---|---|
| 61 | अनुकर्मविधानाच्या परिक्षेत्राचे वास्तुशास्त्रीय विवेचन डॉ. ओमकुमार टोम्पे | 261 |
| 62 | महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक कार्य [illegible] | 264 |
| 63 | माडिया समाजातील स्त्री दर्शन प्रा. डॉ. अनिता देशमुख | 269 |
| 64 | मुल्यशिक्षणात संस्कृतची उपयोगिता छाया भाऊराव अलोने / डॉ. ललिता चदांत्रे | 273 |
| 65 | जागतिकीकरणाचा भारतीय कृषीवर होणारा परिणाम, उदिष्टे आणि आव्हाने प्रा.डॉ. दिलीप नि. लांजेवार | 286 |
| 66 | Main Themes in Rabindranath Tagore's 'Gitanjali' Sangeeta. B. Kulkarni | 291 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 254 | November,2020

# जागतिकीकरणाचा भारतीय कृषीवर होणारा परिणाम, उद्दिष्टे आणि आव्हाने

प्रा.डॉ. दिलीप नि. लांजेवार
भूगोल विभाग प्रमुख मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम

**प्रस्तावना :**

जागतिकीकरण हा २० व्या शतकाच्या अखेरीचा आणि २१ व्या शतकाच्या आरंभीचा परवलीचा शब्द झाला आहे. जागतिकीकरण म्हणजे जगाच्या आर्थिक उत्क्रांतीची परमावधी असे मानले जाऊ लागले. १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर पाश्चिमात्य देशातील भांडवलशाही व सोव्हिएत रशियातील साम्यवाद या दोन परस्पर विरोधी प्रणालीचा पाठपुरावा न करता भारताने लोकशाही समाजवाद मिश्र अर्थव्यवस्था विनियोजन हा मधला मार्ग अवलंबला. परंतू चाळीस वर्ष या तिसऱ्या मार्गावर वाटचाल केल्यानंतर भारतालाही १९९१ साली चलन संकटात सापडल्यानंतर मूक्त बाजारी अर्थव्यवस्था, उदारीकरण व जागतिकीकरणासाठी आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घ्यावा लागला आहे.

जागतिकीकरणाचे तथाकथीत फायदे देशांना कितपत मिळतात याबद्दल संदेह आहे. परंतू अविकसीत देशातील उद्योग, रोजगार, कृषी वन, पर्यावरण, जीवनपध्दती यावर जागतिकीकरणाचे अनेक अनिष्ट व विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. अविकसीत देशात विषवृत्तीय वनसंपदेचा ५५ टक्के भाग जागतिकीकरणामूळे नष्ट झाला आहे. वनसंपदेबरोबरच दरवर्षी ५००० जिवजंतू कायमचे सपुंष्टात येत आहे. ब्रुडलॅंड आयोगाने म्हटल्याप्रमाणे शाश्वत प्रगतीच्या दृष्टीने केवळ सिमीत भोगवादाला बळी न पडता नैसर्गिक संपत्ती व पर्यावरणाचे संरक्षण यांच्यावर लक्ष केंद्रीत करण्याची वेळ आली आहे.

भारतीय शेती आणि शेतकरी, दलाल व व्यापाऱ्यांच्या हातचे बाहूले बनलेले आहेत. त्याला आपल्या मालाची किंमत ठरविता येत नाही. भारतात शेतकऱ्याला २२ प्रकारच्या सबसिडी आहे. डब्लूटीओ च्या तरतूदीमूळे उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ट शेती या न्यायाने तरूणांना शेतीकडे वळावेच लागणार आहे. ग्रामीण विकासाची धोरणे कार्यान्वीत होतील आणि औद्योगिकीकरणामूळे शहरात लोटलेला लोंढा पुन्हा खेडयाकडे वळून कोकणचा कॅलिफोर्नीया, पश्चिम महाराष्ट्राचा इस्त्राईल, मराठवाडयाचा जर्मनी आणि विदर्भाचा चिन मध्ये रूपांतर झाल्याचे दृश पहावयास  मिळेल.

जगातिल एकूण जमिनिपैकी केवळ ११ टक्के जमीन शेतीसाठी उपयुक्त आहे. त्या तुलनेत भारतातील एकूण जमिनिपैकी ५२ टक्के जमीन शेतीसाठी उपयुक्त आहे. तसेच जगात आढळणारे सर्वच १५ जलवायु भारतात सुध्दा उपलब्ध आहे. व जगात आढळणारी ६० प्रकारच्या मृदापैकी जवळपास ४६ प्रकारची मृदा भारतात आहेत. अशा गुणवत्ता व क्षमतेची भारतीय जमीन समृध्द असतानाही भारतीय शेतकरी सुखी व समाधानी नसुन मागील काही वर्षापासून आत्महत्तेकडे झूकलेला आहे.

**जगतिकीकरणाचा भारतीय कृषीवर होणारा परिणाम :**

जगतिकीकरणामधून काही क्षेत्रात सकारात्मक बदल घडून आलेले दिसुन येत असले तरी मात्र भारतीय कृषी क्षेत्रात याचे नकारात्मक परिणाम दिसून येत आहे. ते खालील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

एका बाजूने बि बियाणे, खते व कृषिनाशक औषधे यांच्या पुरवठयावर तर दुसऱ्या बाजूने जागतिक कृषी उत्पादनावर बाजारपेठेवर संपुर्ण नियंत्रण मिळविण्याच्या उद्देशाने कंपन्या

भारतासारख्या देशात ठेकेदारी कृषी व्यवस्था स्थापण्याच्या विचारात आहे. नविन कृषी जागतिकीकरण व्यवस्थेत लहान शेती व शेतकऱ्यांच्या जमिनी आपल्या नियत्रंणाखाली आणून आपण सांगु त्या पिकांच्या आपण त्या पध्दतीने व ठरविलेल्या भावानूसार लहान शेतकऱ्यांनी उत्पादन करावे. हा जागतिकीकरणाचा दबाव दिसून येतो. नविन कृषी जागतिकीकरण व्यवस्थेत लहान शेती व शेतकऱ्यांचे अस्तित्व नाहीसे होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. अन्नधान्याच्या उत्पादनाजागी किफायतशीर उत्पादनाच्या दिशेने कृषीची वाटचाल सुरू झाली तरी अन्नधान्याची आत्मनिर्भरता नष्ट होवून भारतासारखे देश अन्नधान्याच्या आयातीवर अवलंबून राहू लागतील परावलंबीत्व अत्यंत धोकादायक ठरत आहे.

जैवीक विज्ञानानूसार टिश्युकल्चरच्या सहाचने उत्पादन मोठया प्रमाणावर होऊ लागल्यास ते शेतीवर होण्याऐवजी प्रयोगशाळेत होऊ लागले आहे. जागतिक रेटयामूळे बहूराष्ट्रीय कपंन्या शेतीधंदयात उतरलेल्या आहेत. त्यांचे ग्राहकांच्या खिशातील पैसा काढून घेण्याचे कसब वादातीत आहे. भारताला औद्योगिकरणाचे गांजर दाखवून व स्वस्त किंमतीत पिकांची लागवड करून प्रगत देशांनी त्यांना शेतीपासून दुर नेण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिकीकरणाद्वारे मोन्सान्टो या कंपनीने जैवीक तंत्रज्ञानाच्या सहाचने परिवर्तीत पिके व बी बियाणे बनवून सर्व जगात अन्नधान्य व इतर पिकांची साखळी आपल्या अधीन व्हावी असा कंपनीचा प्रयत्न म्हणून काही पीकांचे पेटंट कपंनीने मिळविले. या परिवर्तीत पिकांना युरोपात मोठा विरोध आहे. कारण ती मानव स्वास्थास हानिकारक आहे.

भारतात याच कंपनीने वांझ बी आणण्याचा प्रयत्न केला होता तो सफल झाला असता तर शेतीत तयार झालेले बी धान्ये बी म्हणून वापरता आले नसते आणि या निकृष्ट दर्जाच्या धान्ये उत्पादनामूळे कृषी सुध्दा निकृष्ट दर्जाची झाली असती. १९९१ पासून जागतिकीकरणाच्या काळात कृषी क्षेत्रात पिछेहाट होऊन कृषी खर्चात वाढ व कृषी मालाच्या किंमती घसरल्या आहे. कृषी क्षेत्राच्या अडचणीत भर पडत आहे. जागतिकीकरणामूळे कृषी संदर्भात खालील गोष्टीचे भान विसरल्या गेले आहे. १) कृषी क्षेत्रावर २/३ भारतीयांची उपजिवीका अवलंबून आहे. २) कृषी क्षेत्रात जलसंधारण व भूसंधारण योजना आखणे. ३) कृषी क्षेत्राला योग्य संरक्षण देवून कृषी अर्थव्यवस्था टिकवून ठेवणे.

जागतिकीकरणाच्या नावाने राष्ट्रियकृत बॅकांनी केलेला कृषी पुरवठा १० टक्क्यांवर आणला आहे. पूर्वी १८ टक्के पुरवठा कृषी क्षेत्रासाठी करण्याचे बंधन होते. जागतिकीकरणाच्या काळात कृषी विकास दर ३.७ टक्क्या वरून २.३ टक्के वर आला. २००० – ०१ च्या तुलनेत २००३ – ०४ या काळात अन्नधान्याचे उत्पादन १४ दशलक्ष टनाने घटले आहे. भारतीय कृषी अन्नधान्याऐवजी निर्यात करण्यासाठी पिके घेण्याचा कल वाढलेला असून एक दिवस भारतीय कृषी कोलमडून पडेल अशी परिस्थती जागतिकीकरणाद्वारे निर्माण होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे. १९९१ पासून तत्कालीन सरकारने जागतिकीकरण हे नविन आर्थिक धारेण स्विकारले. या नव्या आर्थिक धोरणात कृषी क्षेत्रात झालेले बदल खालील आकडेवरून स्पष्ट होते.

सन १९९३ – ९४ मध्ये एकून राष्ट्रीय उत्पादनाच्या १.६ टक्के इतकी गुंतवणूक होती ती घसरून १.३ टक्क्यावर आली. देशातील एकूण भाडंवल निर्मीतीत कृषी क्षेत्राचा वाटा १९८७ – ८८ मध्ये ११.७ टक्के होता. तो १९९९– २००० मध्ये २.२९ टक्क्यावर घसरला. कृषी उत्पादनात जी वाढ होत होती तिचा वार्षिक वाढीचा दर १९७९ –८० ते १९८९ – ९० या दशकात ३.७२ टक्के होता. तो पुढील दशकात म्हणजे १९८९ – ९० ते १९९९ – २००० मध्ये २.२९ टक्के इतका झाला. याच काळात शेतीची उत्पादन क्षमताही घसरली.

**आर्थिक सुधारणांच्या पहिल्या टप्प्यात कृषी क्षेत्राची कामगिरी**

| अ.क्र. | क्षेत्राचे नाव | ८० च्या दशकातील वृध्दीदर | ९० च्या शतकातील वृध्दीदर |
|---|---|---|---|
| १ | कृषी उत्पादन | ३.८ | १.७ |
| २ | अन्नधान्य उत्पादन | ३.१ | १.४४ |
| ३ | निव्वळ सिंचनक्षेत्र | २.७ | १.४ |
| ४ | लघुसिंचन क्षेत्र | ३.५ | २.३ |
| ५ | खत वापर | ८.५ | ३.७ |
| ६ | रोजगार | १.०२ | नगण्य |
| ७ | सार्वजनिक गुंतवणूक | ४४६७ कोटी रु. | ३१३१ कोटी रु. |

१९५०– ५१ मध्ये शेतीवर अवलंबून लोकसंख्येचे प्रमाण ७७ टक्के होते. ते २००१ – ०२ मध्ये ६९ टक्के वर आले. यात ८ टक्के घट झाल्याची दिसते. तर कृषी उत्पादनाच्या टक्केवारीत ३६.८ टक्के घट झाली यावरून नविन आर्थिक धोरणानंतर कृषी क्षेत्राची खालावलेली स्थिती सारणीद्वारे लक्षात येते.

वरील नकारात्मक परिणाम दिसून येण्याचे मुख्य कारण म्हणजे अद्यापही औद्योगिक प्रगत राष्ट्रांनी कृषी उत्पादनावर दिल्या जाणाऱ्या सबसिडी यात कोणत्याही प्रकारची काटछाट केली नाही. जी या संघटनेतील तरतुदी प्रमाणे हा करार लागू झाल्यापासून ७ वर्षांच्या आत विकसीत राष्ट्रांनी आपल्या येथे दिल्या जात असलेल्या कृषीमधील सबसिडी २१ टक्क्यांनी व निर्यातीवरील सबसिडीसाठी बजेटमध्ये केल्या जात असलेले प्रावधान यामध्ये २४ टक्के कपाती प्रथम १० वर्षात करणे जरुरी आहे. याच कारणामुळे शेतकरी आपली उपजीविका भागवू शकत नाही. आणि याचा परिणाम प्रत्यक्ष शेतीकडे होत चाललेले दुर्लक्ष आणि त्यामुळेच शेतीचा घसरत चाललेला दर्जा होय.

भारतात हरितक्रांती यशस्वी होवून भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला असला तरी शेतीला एक व्यवसाय म्हणून स्विकारले गेले नाही. कृषी क्षेत्रात विज्ञान व तंत्रज्ञान, नियोजन व व्यवस्थापन यांचा वापर अगदी नगण्य आढळतो. भारतीय कृषीत वाढता असूनही तंत्रज्ञानाचा वापर हा अपूराच झाला आहे.

जागतिकीकरणाचा महत्वपूर्ण भारतीय कृषी संदर्भात झालेला परिणाम म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होय. जागतिकीकरणाच्या लाटेवर स्वार होऊन भारताने कृषी व्यवसायाकडे दुर्लक्ष केले त्यामूळे उत्पादन कमी होऊन शेतकऱ्यावर कर्जाचा बोझा वाढला आणि त्यातून सुटण्याचा पर्याय म्हणून कृषीत राब – राब राबणारा शेतकरी शेवटी आत्महत्येकडे वळला.

**जागतिकीकरणाचा भारतातील कृषी मालाच्या व्यापारावरील परिणाम :**

जागतिकीकरणाचा एक भाग म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या जागतीक व्यापार संघटनेचा भारतीय कृषीक्षेत्रावर परिणाम झाला आहे. १९९४ मध्ये उरुग्वे येथे कृषी व्यापाराच्या प्रश्नावर सभासद राष्ट्रांमध्ये व्यापक चर्चा होवून वाटाघाटी झाल्या. तेव्हा पासून भारताच्या कृषी धोरणात जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर हळूहळू बदल होण्यास सुरवात झाली. जागतिकीकरणाचा स्विकार केल्यानंतर भारताच्या कृषी वस्तुच्या निर्यात व्यापारावर सुरवातीच्या काही वर्षी अनूकूल परिणाम झाल्याचे स्पष्ट होते. तर कृषी वस्तुच्या आयात मुल्यात व एकूण आयातीत असलेला हिस्सा यात वाढ होत गेली याचा अर्थ जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार खुला झाला व त्याचा आयात व्यापारावर अनूकुल परिणाम झाल्याचे स्पष्ट होते.

**भारताचा निवडक कृषीमाल व्यापार (लाख टन) २०११ – २०१८**

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 254
ISSN : 2278-9308
November,2020

| वर्ष | कापुस | | गहू . | | तांदूळ | | साखर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निर्यात | आयात | निर्यात | आयात | निर्यात | आयात | निर्यात | आयात |
| २०११–१२ | २०.१२ | ०.७८ | | | २.१६ | ०.०० | १७.११ | ११.९८ |
| २०१२–१३ | २०.१५ | २.१६ | | | २.४७ | ०.०० | २७.३८ | ०.९९ |
| २०१३–१४ | १९.१४ | १.७८ | ५.५६ | ०.०१ | ७.१८ | ०.०० | २७.९१ | ११.२१ |
| २०१४–१५ | ११.४३ | २.५८ | २.९२ | ०.०३ | १०.१४ | ०.०० | २४.६० | ८.८१ |
| २०१५–१६ | १३.४६ | २.३२ | ०.६१ | ०.५१ | १०.७६ | ०.०० | १९.५४ | १५.३८ |
| २०१६–१७ | १०.०० | ४.९८ | ०.२६ | ५.७५ | ११.९२ | ०.०० | ३८.२६ | ११.४ |
| २०१७–१८ | ३.१५ | ३.७५ | ०.१८ | १.३९ | १०.४२ | ०.०० | २६.६ | ११.४६ |

वरील माहितीच्या आधारे जागतिकीकरणाचा कापुस, गहू, तांदूळ, साखर इ. कृषी मालाच्या आयातीवर अनुकूल परिणाम झाल्याचे दिसून येते. तर काही कृषी वस्तुच्या आयातीवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून येते. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, जागतिकीकरणाच्या स्विकार केल्यानंतर भारताच्या काही कृषी वस्तुच्या आयात व्यापारावर अनुकूल तर काही कृषी वस्तुच्या आयात व्यापारावर प्रतिकूल परिणाम झाला.

**जागतिकीकरणाच्या आधारावर कृषी क्षेत्रावर झालेल्या परिणामाचा निष्कर्ष :**

जागतिक व्यापार संघटनेशी सन १९९५ मध्ये करार झाल्यानंतर कृषीक्षेत्रात बरेच परिवर्तन झाले. बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके यांच्या किमंती वाढल्या. सबसिडी कमी केल्या गेली. एकीकडे शेतीक्षेत्रात दिल्या जाणाऱ्या सुविधांवर गंडातर आणले व दुसरी कडे निसर्गाच्या भरवश्यावर पिकविल्या जाणाऱ्या शेतीत निसर्गाच्या अनियमीतपणामूळे संकट कोसळले. त्यामुळे शेतीवर लागणारा खर्च अधिक व उत्पन्न कमी अशी परिस्थिती उद्भवली. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला.

जागतिकीकरणातून निर्माण झालेला ज्ञ जगातील सर्वात शक्तिशाली आर्थिक संघटन म्हणून विकसीत झाला. सुरवातीला यामधी उद्देश चांगले वाटत असले तरी मात्र भारतात ज्या पध्दतीने कृषी क्षेत्राची दुर्दशा होत आहे. त्यातून येणारे संकट किती भयावह असेल याची कल्पना येते. प्राथमिक उद्देश जरी व्यापाराचे उदारीकरण करणे हे असले तरी मात्र या माध्यमातून आयात निर्यात शुल्क समाप्त करून विकसनशील देशातील बाजारपेठा ताब्यात घेणे, विदेशी गुंतवणूकीच्या मार्गातील अडथळ्यांना दुर करून तेथील बाजारपेठेमध्ये आपल्या मालाला जागा उपलब्ध करून देणे हाच आहे. ज्यामध्ये सीमित कृषी क्षेत्र कोलमडून पडून शेतकरी आत्महत्येच्या दारात जाऊन पोहचला.

निवडक कृषी वस्तुंचा व्यापार व एकूण कृषी व्यापार विचारात घेतला असता त्या संदर्भात काही महत्वाचे निष्कर्ष निघतात.

१) भारतीय कृषी निर्यातीचा एकूण निर्याती असलेला वाटा जागतिकीकरणानंतर १७.९३ टक्के वरून ११.६० टक्के घटला आहे.

२) भारतीय कृषी वस्तू आयातीचा एकूण आयातीत असलेला वाटा जागतिकीकरणानंतर ३.९ टक्के वरून ६.१० टक्के पर्यत वाढलेला दिसून येतो.

३) वस्तु निहाय कृषी निर्यातीचा अभ्यास केला असता कापूस, तंबाखू, प्रक्रिया केलेली फळे, व्यापारी पिके, इ. कृषी वस्तुच्या एकूण निर्यातीतील वाटयाला कमी अधिक प्रमाणात वाढझालेली दिसून येते.

४) वस्तु निहाय कृषी निर्यातीचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, खाद्यतेल, चहा, लाकुड, व लाकडी वस्तु या वस्तूंचा एकूण निर्यातीतील वाटा कमी अधिक



Assistant Professor
Arts Commerce Science College

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 254
ISSN : 2278-9308
November,2020

प्रमाणात वाढला तर कडधान्य, गहू, तांदूळ, दुध व दुधाचे पदार्थ, मसाल्याचे पदार्थ, साखर, तेलबिया इ. वस्तुंचा एकूण निर्यातीत असलेला वाटा घटला.

५) भारताचा एकंदरीत कृषी व्यापाराच्या जागतीक कृषी निर्यातीतील असलेला हिस्सा ०.८५ टक्के वरून १.१४ टक्के पर्यंत वाढलेला दिसून येतो.

अशा प्रकारे जागतिकीकरणाचा कृषी क्षेत्रावर जो परिणाम होतो तो निष्कर्षांच्या आधारे स्पष्ट लक्षात येतो.

**आंतरराष्ट्रीय व्यापाराची उद्दिष्टे :**

शेतमाल विषयक आंतरराष्ट्रीय व्यापार खुला करण्याच्या हेतूने पुढील चार उद्दिष्टे पुढे आले.

१) आयात शुल्कासंबंधी :

विकसीत देशांनी २००६ अखेर आयात करात ३६ टक्के ने घट करावी. विकसनशील देशांनी २००४ अखेर २४ टक्के घट करावी तर कमी विकसीत देशांनी आयात करात घट करण्याची आवश्यकता नाही.

२) संख्यात्मक बंधनासंबंधी :

१९८६–८८ या काळात देशांतर्गत बाजारपेठेच्या किमान ३ टक्के पेक्षा कमी दिल्या आयातीसाठी खुला केला पाहिजे व २००४ अखेर तो ५ टक्के पर्यंत वाढवावा.

३) देशांतर्गत सहायसंबंधी :

शेतकऱ्यांना खते, बीज, कर्जव्याज, बी–बीयाणे इ. वरील सबसिडी सरकारकडून दिली जात होती. ती कमी करणे, सबसिडी व देशांतर्गत अर्थसहाय्य विकसीत देशांनी २००० पर्यंत २० टक्के व विकसनशील देशांनी २००४ पर्यंत १३ टक्क्याने कमी करावी.

४) निर्यात सबसिडी :

२००० अखेर ३६ टक्के विकसीत देशांनी व २००४ अखेर २४ टक्के विकसनशील देशांनी निर्यात सबसिडी कमी करावी असे ठरविण्यात आले.

**जागतिकीकरणाच्या काळात भारतीय कृषीक्षेत्रावर होणारे परिणाम :**

१) ज्या कृषी वस्तु मालावरील निर्बंधामुळे त्यांची आयात अशक्य करून ठेवलेली आहे. अशा वस्तुमालाच्या स्वदेशातील एकूण उपभोगाच्या ३ टक्क्याइतका किमान आयातीस मोकळीक मिळावी व सहा वर्षाअखेरीस ती ५ टक्क्यावर न्यावी.

२) देशवासियांना अन्नधान्य स्वस्त देवून जे संरक्षण दिले जाते ते आयात निर्यातीवर निर्बंध घालून देवू नये. पोषणाच्या दृष्टीने अन्नधान्य त्यांना पुरविणे आवश्यक आहे. अशा लोकांनाच त्यांचे वाटप करावे. इतरांनी ते खुल्या बाजारात विकत घ्यावे.

३) अधिक सहाय्य उत्पादकांशी निगडीत ठेवले जावू नये.

४) कृषी संबंधात वनस्पतीचे वैविध्य राखण्याचा व नवनविन बियाणांचा विचार बौद्धिक स्वामित्वाच्या अधिकारात करावा.

**भारतीय कृषी पुढील जागतिकीकरणाची आव्हाने :**

WTOमूळे भारतीय कृषी समोर काही आव्हाने उभी राहत आहेत.

१) परदेशी कंपन्याना करारमूळे सर्व तऱ्हेचे स्वातंत्र मिळणार असल्यामूळे कच्चा मालाची अमर्याद आयात, तसेच काही उत्पादनांच्या आयातीलाही परवानगी असल्यामूळे [illegible] कंपन्या तरतील आणि योग्य पध्दतीने स्पर्धेला तोंड देऊ न शकणारे कृषी आधारीत भारतीय उद्योग बंद पडतील.

२) आयातावरील संख्यात्मक बंधन कमी असल्यामूळे कृषी माल आयातीवरील ... आणि देशी कंपन्यांच्या उत्पादनाला मर्यादा येवून अनेक उत्पादने बंद पाडण्याचा धोका संभवतो

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 254 | November,2020

३) शेतीवरील सबसिडी कमी केल्यामूळे भारतीय कृषी मालाची किंमत परदेशाच्या तुलनेने वाढून शेतीमालावर गंभीर परिणाम होतील.

४) कृषीक्षेत्रात पेटंट कायद्याच्या बाबतीत विशेष लक्ष पुरविले नाही तर, भविष्यात पश्चातापाची पाळी येवू शकते. पेटंट मिळाल्यानंतर त्या वस्तुच्या विक्रिचा अधिकारही सर्व सदस्य राष्ट्रांमध्ये प्राप्त होतो.

**सारांश :**

एकंदरीत जागतिकीकरणाचा भारतीय कृषीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, हे सर्व परिणाम नकारात्म स्वरूपाचे आहे. भारतीय शेतीत प्रगती होण्याच्या दृष्टीने जास्त प्रयत्न जागतिकीकरणाद्वारे झाले नाही. भारतीय जनतेने व्यापारात्मक दृष्टीकोनातून शेती करण्याचा प्रयत्नच केला नाही. याचे एक कारण भारतीय जनतेची मानसिकता हे सुध्दा सांगता येईल. भारतीय जनतेने व्यापारात्मक दृष्टीकोनातून शेती करण्याचा प्रयत्नच केला नाही. फक्त काही भाग वगळता इतर सर्व भागात शेतीचे उत्पादन हे स्वतः पुरतेच करण्याचा प्रयत्न केला गेलेला दिसून येतो. भारतीय कृषीची पुर्णपणे प्रगती न होण्याचे कारण जागतिकीकरण आणि मानवी मानसिकता असेच वरील विवेचनावरून सांगता येईल.

संदर्भ :

१) अर्थसंवाद — जुलै/ सप्टेबंर २००७ — त्रैमासिक
२) योजना— जानेवारी २०११ — मासिक
३) जागतिकीकरण शाप नव्हे वरदान — डॉ. मुकुंद गायकवाड
४) जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकारण — डॉ. पद्माकर दुभाशी
५) International Trade centre database
http://www.intracen.org/itc/market-info-tools/trade-statistics/

Assistant Professor
Arts, Commerce & Science College
Washim

(SJIF) Impact Factor 7.675 ISSN 2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## February - 2021

ISSUE No - CCXLIV (274)

## Impact of COVID-19 on Higher Education



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & ...

Dr. Amol Bhingar / Dr. Dinesh Deore

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)